||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅंड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९८ वा | गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450

3000 Sq.ft. प्लॉट
N.A. देणे आहे
शिनगारे सिटी सांगोला
वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465

# राज्यात गॅसचा मर्यादित साठा

## हॉटेल व्यावसायिकांसोबत घरगुती गॅसधारक संकटात?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अमेरिका इस्रायल- इराण युद्धाचे परिणाम आता महाराष्ट्रातही दिसू लागले आहेत. ऊर्जेचा मोठा स्रोत असलेल्या मध्य पूर्वेतून होणारा एलपीजी पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे महाराष्ट्रात गॅसची मोठी टंचाई निर्माण झाली आहे.

परिस्थिती इतकी गंभीर आहे की, राज्यातील हॉटेल व्यावसायिकांकडे अवघा एक दिवस पुरेल इतकाच साठा शिल्लक असून, अनेक शहरांत हॉटेल चालकांवर चक्क चुलीवर जेवण बनवण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये गॅस पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा साठा संपत आल्याने हॉटेल चालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे राज्यातील अनेक हॉटेल चालकांवर चक्क चुलीवर जेवण बनवण्याची वेळ आली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये गॅस उपलब्ध नसल्याने अनेक हॉटेल चालकांनी हॉटेलच्या बाहेरच चुलभट्ट्या पेटवल्या आहेत. शहरातील खानावळी आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी गॅसची वाट पाहण्याऐवजी लाकूड आणि कोळशावर आधारित चुलींचा वापर सुरू केला आहे. "हॉटेलमध्ये



मोठ्या प्रमाणात जेवण शिजवावे लागते, इतक्या मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर करणे परवडणारे नाही," अशी व्यथा हॉटेल व्यावसायिकांनी मांडली आहे. उपराजधानी नागपुरातही व्यावसायिक गॅसचा पुरवठा ठप्प झाल्याचे चित्र आहे. गॅस सिलिंडर मिळत नसल्याने अनेक नामांकित हॉटेलच्या मालकांनी आता चुलींचा आधार घेतला आहे. मात्र, यामुळे जेवण मिळण्यास उशीर होत असून ग्राहकांचीही गैरसोय होत आहे.

### सोलापूरात पहाटेपासूनच गॅस वितरण केंद्राबाहेर रांगा

सोलापूरच्या रामवाडी परिसरातील गॅस गोडाऊनवर आज अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळाली. "चार दिवसांपूर्वी बुकिंग करूनही आज नंबर लागला," अशी हतबलता ग्राहकांनी व्यक्त केली. ऑनलाइन बुकिंग होत नसल्याने अनेक नागरिक थेट रिकाम्या टाक्या घेऊन ऑफिसवर धडकले. "टाक्या उपलब्ध आहेत, गर्दी करू नका," असे आवाहन एजन्सीकडून केले जात असले, तरी 'पुढच्या काळात गॅस मिळेल की नाही' या भीतीने ग्राहक हटायला तयार नाहीत.

### जळगावात महिनाभरापासून बुकिंग पेंडिंग

जळगावच्या बी.जे. मार्केटमधील भारत गॅस एजन्सीवर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. "महिनाभरापूर्वी बुकिंग करूनही सिलेंडर मिळत नाही, मग घरात स्वयंपाक कसा करायचा?" असा संतप्त सवाल महिलांनी उपस्थित केला. एजन्सीचे कर्मचारी दाद देत नसल्याचा गंभीर आरोपही ग्राहकांनी केला आहे. युद्धाच्या नावाखाली साठेबाजी तर होत नाही ना? असा संशय आता जळगावकर व्यक्त करत आहेत.

### अमरावतीत सामान्य ग्राहकांचे हाल

अमरावतीच्या रुक्मिणी नगरमध्ये गॅस एजन्सीने केवळ व्हॉट्सॲपवर बुकिंग अनिवार्य केल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. अनेकांकडे कंपनीचे अधिकृत व्हॉट्सॲप नंबर नाहीत, तर काहींना तंत्रज्ञानाची माहिती नाही. अशा परिस्थितीत ज्यांचे व्हॉट्सॲप बुकिंग आहे, त्यांनाच प्राधान्य दिले जात असल्याने सामान्य ग्राहक तासनतास रांगेत उभे आहेत.

### जालन्यातील हॉटेल व्यावसायिक संकटात

जालन्यात व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. हॉटेल चालक आणि छोट्या खानावळींकडे केवळ १ ते २ दिवस पुरेल इतकाच साठा शिल्लक आहे. "गॅस संपला तर चूल पेटवण्याशिवाय पर्याय नाही, पण रोजच्या धंद्याचं काय?" असा प्रश्न जालन्यातील व्यावसायिकांनी उपस्थित केला आहे.

# पंढरपूरात होणार नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील प्रशासकीय कारभाराचा वाढता ताण व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेत सोलापूर जिल्ह्यासाठी आणखीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आले आहे. पंढरपुरात हे कार्यालय होण्याची शक्यता असून यामुळे पंढरपूर, माळशिरस, माढा, सांगोला या तालुक्यातील नागरिकांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा आला आहे

प्रशासकीय कामकाजात वाढलेला ताण लक्षात घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यात ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजुरी दिली आहे. त्यामध्ये सोलापूरचा समावेश आहे. राज्यातील काही जिल्ह्यात प्रशासकीय कामकाजाचा ताण वाढ असल्याने मंगळवारी महसूलमंत्री बावनकुळे यांनी विधानसमेत राज्यात अकरा अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजुरी दिल्याची घोषणा केली आहे. सोलापूर जिल्ह्याचा भौगोलिक विस्तारमोठा आहे.

महसूल विभागाशी संबंधित कामांचा ताणही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे नागरिकांची कामे जलदगतीने मार्गी लागावीत, प्रशासन अधिक कार्यक्षम व्हावे, या उद्देशाने अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याचा निर्णय महसूलमंत्र्यांनी घेतला आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय झाल्यानंतर महसूल विभागातील विविध प्रकरणांची सुनावणी, जमीन विषयक कामे, तसेच प्रशासकीय निर्णयांची प्रक्रिया अधिक गतीने होणार आहे. नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयातील कामासाठी होणारी प्रतीक्षा आणि गदीर्ही अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय आल्यावर कमी होण्यास मदत होणार आहे.

# सोलापुरात गॅस सिलिंडरची 'अंत्ययात्रा'

## आंदोलनाद्वारे केंद्र सरकारचा निषेध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गॅस सिलिंडर दरवाढ आणि टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाला विरोध करत सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. देशभरात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने घरगुती गॅस मिळण्यात अडचणी वाढल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर महागाईच्या थैमानाने सामान्य जनतेच्या जीवनावर झालेल्या परिणामाची जाणीव करून देण्यासाठी काँग्रेसने एक अनोखा आणि प्रभावी आंदोलन केले.

### प्रतिकात्मक अंत्ययात्रा

काँग्रेस भवनाच्या परिसरातून सुरू झालेल्या या आंदोलनात एका गॅस सिलिंडरला हार घालून त्याला तिरडीवर ठेवण्यात आले. नंतर ही प्रतिकात्मक अंत्ययात्रा जिल्हा परिषद कार्यालयापर्यंत काढण्यात आली. तिरडीसोबत काँग्रेस कार्यकर्ते जोरदार घोषणाबाजी करत होते. वाढत्या महागाईमुळे गरिब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना दिवसेंदिवस आर्थिक ओझे वाढत असल्याचा आरोप करत या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारला कडक संदेश देण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी केंद्र शासनाच्या धोरणांविरोधात एकत्र येत निषेध



व्यक्त केला. "गॅस सिलिंडर मिळणे कठीण झाले असताना दरवाढ करणे ही जनतेविरोधी कारवाई आहे," असे मत नरोटे यांनी व्यक्त केले. या संपूर्ण प्रक्रियेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यामुळे आंदोलनाला अधिक व्यापकता मिळाली आहे.

### गॅस दरवाढीच्या मुद्द्याला आता राजकीय रंग

देशातील गॅस दरवाढीच्या मुद्द्याला आता राजकीय रंग चढवल्या जात आहेत. काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले की, महागाई नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत, अन्यथा असे आंदोलन राज्यभर विस्तारित करण्यात येईल. या निषेध मोचार्मुळे जिल्हा परिषद परिसरात काही काळ वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती. मात्र, शांततेत आंदोलन संपन्न झाले.

# पोलिसांशी झटापट करत फेरीवाल्यांचा महापालिकेवर मोर्चा

## राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याची मागणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील फळ-भाजी विक्रेते, चारचाकी फेरीवाले, खोकेधारक व जीवनावश्यक वस्तू विकणाऱ्या पथविक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी बुधवारी सीटू संलग्न हॉकर्स युनियनच्या वतीने महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान आंदोलक व पोलिसांमध्ये काही काळ जोरदार धक्काबुक्की झाली.

सीटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख आणि राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ११ वाजता दत्तनगर येथील लाल बावटा कार्यालयापासून मोचार्ची सुरुवात झाली. दत्त चौक, पद्मशाली चौक, किडवाई चौक, यशोधरा हॉस्पिटल, सिद्धेश्वर प्रशाला व श्री सिद्धेश्वर मंदिर मार्गे हा मोर्चा सोलापूर महानगरपालिकेकडे निघाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोलिसांनी मोचार्ला अडविण्याचा प्रयत्न केला. यावेळी आंदोलकांना पकडणे व धक्काबुक्की झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र आंदोलकांनी पोलिसांचा बंदोबस्त तोडून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत मोर्चा नेला व जोरदार घोषणाबाजी केली.



मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. दरम्यान, महापालिकेतील प्रशासकीय अधिकारी अनुपस्थित असल्याने सदर बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. ढवळे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

यावेळी बोलताना कॉ. एम. एच. शेख यांनी सांगितले की, केंद्र सरकारने Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014 तसेच Deendayal Antyodaya Yojana - National Urban Livelihoods Mission अंतर्गत राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू केले आहे. या कायद्यानुसार फेरीवाले, हातगाडीधारक व पथविक्रेत्यांचे संरक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे तसेच हॉकर्स झोन निश्चित करणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

कॉ. युसुफ शेख (मेजर) म्हणाले की, सोलापूरमध्ये उद्योगधंदे बंद पडल्यामुळे बेरोजगारी वाढली असून अनेक नागरिक भाजीपाला, फळे व किरकोळ वस्तू विकून उदरनिर्वाह करत आहेत. शहरात सुमारे ६१३० फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगितले जात असले तरी त्यांना ओळखपत्र व हॉकर्स झोन निश्चित करण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.

मोर्चाद्वारे फेरीवाल्यांना अधिकृत ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्र देणे, शहराच्या लोकसंख्येच्या किमान २.५ टक्के फेरीवाल्यांना जागा उपलब्ध करून देणे, पथविक्रेता समितीची तातडीने बैठक घेणे, फेरी परवाना शुल्क ₹५००० ऐवजी ₹६०० करणे, भाजी मंडईतील दररोजची ₹२५ फी कमी करून ₹१० करणे तसेच अधिकृत हॉकर्स झोन निश्चित होईपर्यंत अतिक्रमण कारवाई थांबविणे आदी मागण्या करण्यात आल्या.

राष्ट्रीय फेरीवाला कायदा व शासन निर्णयानुसार या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

मोर्चात माजी नगरसेविका कॉ. नलिनीताई कलबुर्गी, कॉ. नसीमा शेख, ॲड अनिल वासम कॉ. सुनंदाताई बल्ला, कॉ. एम. हनीफ सातखेड, कॉ. रंगप्पा मरेड्डी यांच्यासह मोठ्या संख्येने फेरीवाले सहभागी झाले होते.

सदर मोर्चा यशस्वी करण्यासाठी कॉ. दाउद शेख, कॉ. खाजाभाई करजगी, कॉ. नरेश दुगाणे, अशोक बल्ला, कॉ. शहाबुद्दीन शेख, जावेद सगरी, चांद शेख, जाफर शेख, गणेश वाघमारे, शांताबाई कोळी, अकिल शेख, असिफ पठाण, रहीम नदाफ, अमीन शेख, प्रशांत चौगुले, राजेश काशीद, भारत पाथरूट, प्रकाश कलबुर्गी, प्रदीप मरेड्डी आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस चा तुटवडा भासणार नाही- प्र जिल्हाधिकारी जंगम

## नागरिकांनी इंधन व गॅस सिलेंडरची अतिरिक्त साठवणूक न करण्याचे आवाहन

## कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा प्रशासनाची बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या इंधन व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीशी चर्चा झालेली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरचा कुठेही तुटवडा भासणार नाही. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरची अतिरिक्त साठवणूक करू नये. तसेच कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य



कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

प्रभारी जिल्हाधिकारी श्री जंगम पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यात मागणी प्रमाणे गॅसचा पुरवठा होणार आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता गॅस सिलेंडरचा साठा करून ठेवू नये. गॅस पुरवठा कंपन्या व त्यांच्या एजन्सी यांच्याशी जिल्हा प्रशासन सातत्याने संपर्कात असून मागणीप्रमाणे गॅस पुरवठा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्ह्यातील गॅस कंपनीचे समन्वय अधिकारी यांची तातडीची बैठक घेऊन गॅस सिलेंडर वाटप नियोजनाचा आढावा घेतलेला आहे. जिल्ह्यात एकूण 94 गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यामध्ये बीपीसीएल 54, एचपीसीएल 20 व आयओसीएल (पान 2 वर..)

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रॅंड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# हद्दवाढ भागास 6, तर गावठाणास 4 दिवसांनी पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या उन्हामुळे आणि पाण्याच्या वाढत्या वापरामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात महापालिकेने मंगळवारपासून बदल केला आहे. नव्या नियोजनानुसार शहराच्या हद्दवाढ भागात पाच ते सहा दिवसांनी तर गावठाण भागांमध्ये चार दिवसांनी पाणी पुरवठा होईल. हा बदल उन्हाळा संपेपर्यंत कायम राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना शहरातील जलस्रोतांवर



मोठा ताण येऊ लागला आहे. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने पाणी पुरवठ्याच्या दिवसांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.गावठाण भाग तसेच काही उप नगरांमध्ये सध्या तीन दिवसांनी

> शहरात पाणी टंचाई निर्माण होऊ नये आणि उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करता यावे, यासाठीच हा निर्णय घेण्यात आला. पाण्याचा अपव्यय टाळून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. **- व्यंकटेश चौबे,** सार्वजनिक आरोग्य अभियंता

होणारा पाणी पुरवठा आता चार दिवसांनी करण्यात येणार आहे. पाकणी आणि भवानी पेठेतील जल शुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणी पुरवठा हा एक दिवस पुढे सरकला आहे. म्हणजेच तीन दिवसाआड होणारा पाणी पुरवठा आता चार दिवसांनी होणार आहे. त्यामुळे गावठाणातील उप नगरांना एक दिवस उशीरा पाणीपुरवठा केला जाणार आहे.

हद्दवाढ भागांमध्ये सध्या पाच दिवसांनी होणारा पाणी पुरवठा आता पाच ते सहा दिवसांच्या अंतराने केला जाणार आहे. त्यामुळे पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# शाळेतील शिक्षकच भक्षक ठरला तर- ?

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील वडेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत घडलेली घटना केवळ एका गावापुरती किंवा एका शाळेपुरती मर्यादित नाही. ती संपूर्ण समाजाला हादरवणारी आणि शिक्षण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विश्वासाने मुलांना शाळेत पाठवणाऱ्या पालकांसाठी ही घटना अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक आहे. या प्रकरणात शिक्षक अनिल राऊत याच्यावर शाळेतील पाच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी ज्ञान देणारे मार्गदर्शक असतात. समाजात शिक्षकाला 'गुरू'म्हणून मान दिला जातो. परंतु जेव्हा हाच शिक्षक विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा गैरफायदा घेतो, तेव्हा तो केवळ गुन्हा राहत नाही, तर तो संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक पायालाच तडा देणारा प्रकार ठरतो. या प्रकरणाचे सर्वात महत्त्वाचे आणि धैयार्चे पाऊल म्हणजे एका पीडित मुलीने दाखवलेले साहस. भीती, धमक्या आणि मानसिक दडपण सहन करत असूनही तिने आपल्या पालकांना संपूर्ण घटना सांगितली. तिच्या धैर्यामुळेच हा प्रकार उघडकीस आला. अन्यथा अशा अनेक घटना भीतीमुळे दडपल्या जातात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. घटना उघडकीस आल्यानंतर संतप्त पालकांनी आरोपीला मारहाण करत पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपीला अटक केली आणि त्याच्यावर Protection of Children from Sexual Offences Act अंतर्गत तसेच भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या कायद्यात बालकांवरील लैंगिक अत्याचारांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद आहे. तथापि, केवळ आरोपीला अटक करून प्रकरण संपत नाही. या घटनेतून काही मूलभूत प्रश्न उभे राहतात. शाळांमध्ये शिक्षकांची पार्श्वभूमी तपासणी किती काटेकोरपणे केली जाते? विद्यार्थ्यांच्या तक्रारी ऐकण्यासाठी आणि त्यावर तत्काळ कारवाई करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे का? शाळांमध्ये बालसुरक्षा धोरण प्रभावीपणे राबवले जाते का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधण्याची वेळ आता आली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना 'चांगला स्पर्श – वाईट स्पर्श' याबाबत जागरूक करण्याची गरज आहे. मुलांना भीती न बाळगता तक्रार करण्यासाठी सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. तसेच शिक्षक आणि शाळा प्रशासनासाठी बालसुरक्षा आणि नैतिकतेबाबत नियमित प्रशिक्षण अनिवार्य करणेही गरजेचे आहे. या प्रकरणात पोलिसांकडून तपास सुरू असून आणखी काही मुली पीडित आहेत का, याचाही शोध घेतला जात आहे. प्रशासनाने पीडित मुलींना वैद्यकीय आणि मानसिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे, ही सकारात्मक बाब असली तरी समाज म्हणून आपली जबाबदारी इथेच संपत नाही. भंडाऱ्यातील ही घटना एक कठोर इशारा आहे. शाळा ही विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह जागा असली पाहिजे. जर शाळेतच त्यांची सुरक्षितता धोक्यात येत असेल, तर ती शिक्षण व्यवस्थेसाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे.

आज गरज आहे ती केवळ आरोपीला कठोर शिक्षा देण्याची नाही, तर अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी मजबूत व्यवस्था उभारण्याची. पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाज सर्वांनी मिळून मुलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले, तरच शिक्षण व्यवस्था खऱ्या अर्थाने विश्वासार्ह राहू शकते.

# यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

१२ मार्च हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, दूरदर्शी नेते, कुशल प्रशासक आणि लोकाभिमुख विचारवंत म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी केली जाते. महाराष्ट्राच्या घडणीत ज्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे अशा या नेत्याचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते; तर शिक्षण, सहकार, उद्योग, संस्कृती, साहित्य, संरक्षण व्यवस्था, ग्रामीण विकास आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीपर्यंत त्यांचा प्रभाव व्यापक होता. यशवंतराव चव्हाण हे केवळ एका राज्याचे मुख्यमंत्री किंवा देशाचे संरक्षणमंत्री नव्हते, तर ते एक व्यापक दृष्टी असलेले राष्ट्रनेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दूरदृष्टी, प्रगल्भता, व्यवहारज्ञान, समन्वयाची वृत्ती आणि लोकहिताची प्रामाणिक बांधिलकी यांचा सुंदर संगम दिसून येतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय इतिहासात त्यांचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाते.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी त्यांच्या आजोळी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावात एका सामान्य कुटुंबात झाला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर देवराष्ट्रे हे गाव सांगली जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण तर आईचे नाव विठाबाई होते. यशवंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि घराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या आईवर आली. विठाबाई या अत्यंत कष्टाळू, स्वाभिमानी आणि दूरदर्शी स्त्री होत्या. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलाच्या शिक्षणासाठी अथक प्रयत्न केले. आईच्या संस्कारांचा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम झाला. आईकडून त्यांना परिश्रम, प्रामाणिकपणा, स्वाभिमान आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या यशवंतरावांना बालपणापासूनच शेतकरी आणि सामान्य लोकांच्या समस्या जवळून पाहायला मिळाल्या. त्यामुळे पुढे राजकारणात आल्यावर त्यांनी ग्रामीण विकासाला विशेष प्राधान्य दिले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले. पुढे त्यांनी कोल्हापूर आणि पुणे येथे उच्च शिक्षण घेतले. शिक्षणाच्या काळातच त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडू लागला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू यांसारख्या राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणामुळे त्यांच्यात देशभक्तीची भावना जागृत झाली. त्यामुळे त्यांनी विद्यार्थी अवस्थेतच स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. तुरुंगवासाच्या काळात त्यांनी अनेक राष्ट्रीय नेत्यांच्या सहवासातून राजकारण, समाजकारण आणि राष्ट्रनिर्मितीचे धडे घेतले. याच काळात त्यांची विचारसरणी अधिक प्रगल्भ झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय काम सुरू केले. त्यांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या पुनर्निर्माणाच्या प्रक्रियेत त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. १९५० च्या दशकात ते महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे नेते म्हणून उदयास आले. त्यांची कार्यक्षमता, संघटन कौशल्य आणि समन्वयाची क्षमता पाहून त्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या. १९५६ मध्ये ते द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्या काळात राज्यात मराठी आणि गुजराती भाषिक लोकांमध्ये वेगळ्या राज्याच्या मागणीवरून आंदोलन सुरू होते. या अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीत त्यांनी संयम, समन्वय आणि दूरदृष्टी दाखवून परिस्थिती हाताळली.



१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या घडणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, सहकार, उद्योग, शेती, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास यावर विशेष भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सहकार चळवळीला मोठी चालना मिळाली. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी दूध संघ यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा हा त्यामागचा मूलभूत उद्देश होता. आज महाराष्ट्र सहकार क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखला जातो, त्यामागे यशवंतराव चव्हाण यांचे दूरदर्शी नेतृत्व मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे.

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. "शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे" या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता यावर भर दिला. त्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था उभारल्या गेल्या. आज महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राची भक्कम पायाभरणी ही त्यांच्या दूरदर्शी धोरणांमुळे झाल्याचे मानले जाते.

कृषी आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, सिंचन सुविधा वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रोत्साहित करणे यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण भागात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा आणि शिक्षण सुविधा वाढवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांच्या धोरणांमुळे ग्रामीण महाराष्ट्रात विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.

यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय पातळीवरील योगदानही अत्यंत महत्त्वाचे आहे. १९६२ साली भारत-चीन युद्धानंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्या अत्यंत कठीण काळात त्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. त्यांनी भारतीय सैन्याचे पुनर्रचना, आधुनिकीकरण आणि बळकटीकरण यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या नेतृत्वाखाली संरक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे भारतीय सैन्य अधिक सक्षम आणि सक्षम बनले. त्यांच्या कार्यामुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले. पुढे त्यांनी वित्तमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि गृहमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. प्रत्येक पदावर त्यांनी प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने काम केले. राष्ट्रीय एकात्मता, आर्थिक विकास आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. ते अत्यंत अभ्यासू आणि विचारशील नेते होते. कोणताही निर्णय घेताना ते विविध पैलूंचा सखोल विचार करत असत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वावर सर्वच स्तरांतील लोकांचा विश्वास होता.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकीय नेते म्हणून मर्यादित नव्हते. ते साहित्य, संस्कृती आणि बौद्धिक चर्चांमध्येही रस घेणारे विचारवंत होते. त्यांना वाचनाची आणि लेखनाची विशेष आवड होती. त्यांनी अनेक पुस्तके आणि लेख लिहिले. त्यांच्या लेखनातून समाज, राजकारण आणि संस्कृती याबद्दलचे सखोल चिंतन दिसून येते. "कृष्णाकाठ", "सह्याद्रीचे वारे" यांसारख्या त्यांच्या साहित्यकृतींना विशेष लोकप्रियता मिळाली. त्यांच्या लेखनात ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि मानवी मूल्यांचे सुंदर चित्रण आढळते.

सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा त्यांना अभिमान होता. साहित्य, कला, नाटक, संगीत यांसारख्या क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. विविध सांस्कृतिक संस्था आणि साहित्य संमेलनांना त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन अधिक समृद्ध झाले.

यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व समन्वयवादी आणि लोकाभिमुख होते. विविध मतप्रवाह आणि विचारसरणी असलेल्या लोकांना एकत्र आणून सामूहिक निर्णय घेण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. ते संवादावर विश्वास ठेवणारे नेते होते. मतभेद असले तरी संवादातून मार्ग काढण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटणारे नेता बनले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक आव्हाने आणि संघर्ष आले, परंतु त्यांनी प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना केला. त्यांची कार्यपद्धती संयमी, व्यावहारिक आणि दूरदर्शी होती. त्यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरता आणि विकासाचे प्रतीक बनले.

आजच्या काळात त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रासंगिकता अधिक जाणवते. सामाजिक समता, ग्रामीण विकास, शिक्षणाचा प्रसार, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि राष्ट्रीय एकात्मता या बाबी आजही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यातून या मूल्यांचे जतन आणि संवर्धन केले. त्यामुळे त्यांचे जीवन आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते.

१२ मार्च रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या कार्याची आणि विचारांची आठवण काढतो. त्यांच्या जीवनातून आपल्याला कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, लोकसेवा आणि राष्ट्रभक्ती यांचे धडे मिळतात. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टी, समन्वय आणि लोकहिताची बांधिलकी आवश्यक असते, हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते.

आज महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीकडे पाहिले असता यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची जाणीव प्रकर्षाने होते. सहकार चळवळ, शिक्षणाचा प्रसार, औद्योगिक विकास, सांस्कृतिक समृद्धी आणि लोकशाही मूल्यांची जपणूक या सर्व क्षेत्रांत त्यांनी घातलेली पायाभरणी आजही महाराष्ट्राच्या विकासाचा मजबूत आधार आहे. म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांना "आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार" असे संबोधले जाते. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वगुणांनी महाराष्ट्राला विकासाच्या नव्या मार्गावर नेले. त्यांचे जीवन आणि कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून ते आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजाच्या प्रगतीसाठी आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे.

अशा या महान नेत्याच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन करूनच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल...

20 अशा गॅस एजन्सी आहेत. आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर या गॅस एजन्सी मार्फत गॅस सिलेंडर वितरण नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत, अशी माहिती संबंधित गॅस कंपनी समन्वय अधिकारी यांनी दिली. हे बदल खालील प्रमाणे...

१. गॅस एजन्सीमार्फत व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या सर्व गॅस सिलेंडरचे बुकींग पुर्णतः बंद केलेले आहे. २. शासकीय संस्था, रुग्णालय, एनटीपीसी, अन्नछत्र मंडळ यांना वरील नियमामधून सूट देण्यात आलेली आहे. ३. व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडर बाबत उच्चस्तरीय चर्चा करणेत येत असून सर्व बाबींचा विचार करून यावर निर्णय घेणेत येईल. ४. घरगुती गॅस सिलेंडर बुक केलेनंतरचा प्रतिक्षा कालावधी २५ दिवसांचा करणेत आलेला आहे. ५. घरगुती गॅस सिलेंडर वितरीत करताना कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या OTP ची खातरजमा करणेत येत आहे. गॅस सिलेंडरचा दुरुपयोग होवू नये याकरीता OTP पडताळणी अनिवार्य करणेत आलेली आहे. तसेच EKYC ही करणेत येईल.

जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत गॅस सिलेंडर वितरण नियंत्रित करणे करीता तसेच काळाबाजार रोखणे याकरीता तालुका स्तरीय दक्षता पथक गठीत करणेत आलेले आहे. सदर दक्षता पथकांना गॅस एजन्सीच्या तपासण्या करून दैनंदिन गॅस सिलेंडर आवक जावक वर नियंत्रण ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहे. सोलापूर जिल्हयाची घरगुती गॅस ग्राहकांची माहे फेब्रुवारी २०२६ अखेर एकुण संख्या ११,८८,२५८ इतकी आहे. सोलापूर जिल्हयाची व्यावसायिक गॅस ग्राहकांची माहे फेब्रुवारी २०२६ अखेर एकुण संख्या १०,८०० इतकी आहे. सोलापूर जिल्हयाकरीता घरगुती गॅस ची दैनंदिन गरज २५० मे.टन इतकी असून व्यावसायिक गॅस ची १० मे.टन इतकी आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता 13 मार्च रोजी वितरीत होणार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेअंतर्गत डिसेंबर 2025 ते मार्च 2026 या कालावधीतील 22 वा हप्ता मा. प्रधानमंत्री यांच्या शुभहस्ते दिनांक 13 मार्च 2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजता ज्योती-बिष्णु आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र, खानापारा, गुवाहाटी (आसाम) येथे वितरित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार मिळावा यासाठी ही योजना फेब्रुवारी 2019 पासून सुरू केली आहे. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्षी रु. 6,000 इतकी आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये (प्रति हप्ता रु. 2,000) त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते. आतापर्यंत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना 21 हप्त्यांद्वारे सुमारे रु. 39,300 कोटींचा लाभ वितरित झाला आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी भूमी अभिलेख नोंदणी अद्ययावत करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे तसेच ई-केवायसी प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. सद्यस्थितीत या तिन्ही बाबींची पूर्तता केलेल्या सुमारे 91.19 लाख शेतकरी कुटुंबांना दिनांक 13 मार्च रोजी सुमारे रु. 1,837 कोटी इतकी रक्कम थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.

सदर कार्यक्रमाचे आयोजन राज्यातील कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, शासकीय कार्यालये, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs), शेतकरी उत्पादक संघटना (FPOs) आणि सहकारी पतसंस्था (PACS) येथे करण्यात येणार आहे. नागरी सुविधा केंद्रांवरूनही या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे.

राज्यातील कृषी विभाग, महसूल व वने विभाग तसेच ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा समारोह साजरा होणार असून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://pmindiawebcast.nic.in या संकेतस्थळावरून करण्यात येईल. राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पुणे येथील कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

# 'कुणबी प्रमाणपत्र का मिळत नाही?' मराठा आमदारांना जाब विचारा - जरांगे पाटील

**लातूर (कटूसत्य वृत्त) :-** मराठा समाजाला आरक्षणासाठी आवश्यक असलेली कुणबी प्रमाणपत्रे तात्काळ देण्यात यावीत, अन्यथा सहकार्य न करणाऱ्या आमदारांना 2029 च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत करा, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते यांनी केले. लातूर जिल्ह्यातील माकणी येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी मराठा समाजाला आपल्या मतदारसंघातील आमदारांना जाब विचारण्याचे आवाहन केले.

जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला गेल्या सत्तर वर्षांत जे मिळाले नाही, ते मराठा आरक्षणाच्या आंदोलनातून मिळवून दिले आहे. राज्यभरात मराठा समाजाच्या वंशावळीशी संबंधित सुमारे ५८ लाख नोंदी सापडल्या असून त्याआधारे कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याने समाजात नाराजी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.



सरकारने मराठा समाजाच्या नोंदींवर आधारित प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय (GR) काढला आहे. तरीही अनेकांना अद्याप प्रमाणपत्र मिळत नसल्याबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केला. 'तुमच्या सरकारने जीआर काढला आहे, मग आमच्या मुलांना प्रमाणपत्र का मिळत नाही?'असा सवाल करत त्यांनी आमदारांनी प्रशासनावर दबाव आणून प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणी केली.

जरांगे पाटील यांनी सांगितले की, तहसीलदार आणि एसडीओ कार्यालयांमध्ये जाऊन पाठपुरावा करा, त्यांना फोन करून प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया जलद करण्यास सांगा. मराठा समाजाच्या मुलांना शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी ही प्रमाणपत्रे अत्यंत आवश्यक आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सहकार्य न करणाऱ्या आमदारांविरोधात तीव्र भूमिका घेण्याचा इशारा देत त्यांनी सांगितले की, 'ज्या आमदारांनी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मदत केली नाही, त्यांना 2029 च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत करा.' समाजाच्या प्रश्नांवर दुर्लक्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींना जनता धडा शिकवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात राजकारणापासून दूर राहण्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली. 'आम्हाला राजकारणाचा नाद नाही. असता तर मागील विधानसभा निवडणुकीतच आम्ही धुराळा उडवला असता,'असे ते म्हणाले. मात्र मराठा समाजातील गरीब कुटुंबांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी प्रमाणपत्र मिळवून देणे ही सर्व लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

मराठवाड्यातील सर्व आमदारांनी तहसीलदार, एसडीओ आणि जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण गतीमान करावे, अशी मागणीही त्यांनी केली. ज्या समाजाने आपल्याला निवडून दिले, त्यांच्यासाठी काम करणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

मराठा समाज मोठा असून त्याच्याविरोधात असणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी समाजाने संयम आणि एकजूट ठेवण्याचे आवाहन केले. 'उद्यापासून आपल्या मतदारसंघातील आमदारांना जाब विचारा आणि आपल्या मुलांसाठी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा,' असे आवाहन त्यांनी मराठा समाजाला केले.

दरम्यान, मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्द्यावर राज्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## CHANGE IN NAME

My old name was **Waid Allauddin Tamboli**, but I have changed my new name to **Wahid Allauddin Tamboli**. Although the person with both names is the same, from today onwards I should be known by my new name.

## CHANGE IN NAME

My old name was **Munera Wahid Tamboli**, but I have changed my new name to **Khatunbi Wahid Tamboli**. Although the person with both names is the same, I should be known by my new name from today onwards.

# पीएम नॅशनल अप्रेंटिसशिप मेळावा १६ मार्च रोजी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी P.M. National Apprenticeship Mela(PMNAM) चे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दिनांक १६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे होणार आहे. या मेळाव्यात आय.टी.आय उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी सहभागी होऊ शकतात. सोलापूर जिल्ह्यातील सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक सल्लागार, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर येथील एम. एम. बिडकर यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील मा.महापौर यांच्या कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेवक गणेश वानकर,नगरसेवक विजय चिप्पा,नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक सार्थक बडवे, नगरसेवक सतिश सिरसिल्ला, नगरसेवक सत्यजीत वाघमोडे, नगरसेविका विजया खरात, नगरसेविका श्रद्धा पवार, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका सोनाली गायकवाड, नगरसेविका कल्पना कदम नगरसेविका निर्मला जंगम, नगरसेविका श्वेता खरात, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका अलका भवर, नगरसेविका सारिका खजूर्गी, नागेश खरात, किरण पवार, वसू यलदंडी, सिद्धाराम खजूरगी, अविनाश दासरी आदी मान्यवर उपस्थित होते.

## वात्रटिका

### सगळा गोंधळ

घात की अपघात चर्चेत
सामान्यांना धाकधूक आहे...
कोण म्हणते ही चूक आहे
तर कोण म्हणते घोडचूक आहे...
जर तसे असेल तर मग
विश्वास कोणावर ठेवावा...
इथं नाही मिळाला न्याय
तर देवाचा दरवाजा ठोठवावा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४१२/२०२४

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. मुशीरअहेमद अजिमोद्दीन काझी,रा.काझी गल्ली लातूर ता जि. लातूर(असल्यास, तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. काझी गल्ली लातूर ता जि. लातूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक १२ ऑक्टोबर १९६४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १२ ऑक्टोबर १९६४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता.बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) कार्यकारी दंडाधिकारी बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४१८/२०२४

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१.अझहर अजिमाद्दीन काझी,रा.कसबा पेठ,बार्शी ता. बार्शी जि.सोलापूर(असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. कसबा पेठ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक १४ ऑगस्ट १९५९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १४ ऑगस्ट १९५९रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) कार्यकारी दंडाधिकारी बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १२९/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. नाजनीन शौकत तांबोळी, रा. इब्राहिम मंझिल, पटवेकार मस्जिद शेजारी अहिल्यानगर ता. अहिल्यानगर (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार **विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. इब्राहिम मंझिल, पटवेकार मस्जिद शेजारी अहिल्यानगर ता. अहिल्यानगर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९७८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९७८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १६८/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. आल्ताफ युसूफ शेख रा. बार्शिंगे प्लॉट बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार **विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. बार्शिंगे प्लॉट बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ९९/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शबाना महंमद शरीफ बागवान,रा. पानगाव ता. बार्शी जि. सोलापूर (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार **विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. पानगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. पानगाव ता. बार्शी यांचा मौजे पानगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक २४ जुलै १९८५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २४ जुलै १९८५ रोजी मौजे पानगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४४/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शाहीन अबुताहेर पिरजादे,रा. बिडी घरकुल हैद्राबाद रोड सोलापूर (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार **विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. काटेगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. बिडी घरकुल हैद्राबाद रोड सोलापूर यांचा मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९७१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९७१ रोजी मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४५/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. नसरीन अबुताहेर पिरजादे,रा. म्हात्रे चाळ शिवाजीनगर अंबरनाथ ईस्ट ठाणे (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. काटेगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. म्हात्रे चाळ शिवाजीनगर अंबरनाथ ईस्ट ठाणे यांचा मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६८ रोजी मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४६/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शबाना शकुर मोगल,रा. झाडबुके मैदान बार्शी (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) **विरूध्द** } अर्जदार

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. झाडबुके मैदान बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०२ जुन १९७७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९७७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४७/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. मुमताज हारुण मोगल,रा. कॅन्सर हॉस्पिटल वाणी प्लॉट बार्शी (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. कॅन्सर हॉस्पिटल वाणी प्लॉट बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९६२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जून १९६२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४८/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. नर्गिस हुसेन शेख,रा. गणेश पेठ, मंल बजार सोलापूर (असल्यास,तर्फे वकीलमुजाहिद मु.तांबोळी) **विरूध्द** } अर्जदार

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. गणेश पेठ, मंल बजार सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०५ में १९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म- मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०५ मे १९९४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ६१/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शाहनवाज अब्दुलसमी सौदागर,रा. अजिक्य नगर कोरेगांव ता. कोरेगाव (असल्यास, तर्फे वकीलसरफराझ मुश्ताफ मुजावर) **विरूध्द** } अर्जदार

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. अजिक्य नगर कोरेगांव ता.कोरेगाव यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०३ जुन १९८० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०३ जुन १९८० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४३५/२०२४

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. बीबीफातीमा महेबूब हावरे रा. इंदिरा नगर औसा ता. औसा (असल्यास, तर्फे वकीलसरफराझ मुश्ताफ मुजावर) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. इंदिरा नगर औसा ता. औसा यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ जुन १९९१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९९१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. २०/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. हलीमा शब्बीर अहेमद मोमीन,रा. जमखाने गल्ली मिनाक्षी चौक बिजापूर (असल्यास, तर्फे वकीलसरफराझ मुश्ताफ मुजावर) **विरूध्द** } अर्जदार

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. जमखाने गल्ली मिनाक्षी चौक बिजापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ ऑगस्ट १९७९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म- मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ ऑगस्ट १९७९ रोजी मोजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. २२/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. सलीम महमदहयात पानसे, रा. ४२४ प्लॉट नं ७ माटुंगा कॉलनी शिवाजी नगर मुंबई (असल्यास, तर्फे वकीलसरफराझ मुश्ताफ मुजावर) **विरूध्द** } अर्जदार

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. ४२४ प्लॉट नं ७ माटुंगा कॉलनी शिवाजी नगर मुंबई यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ३१ मे १९६२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ३१ मे १९६२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

## जाहिर नोटीस
जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. २३/२०२५

**मे.कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी यांच्या न्यायालयात**

१. जनाबाई दशरथ ढाळे,रा. लासुर्णे ता. इंदापूर (असल्यास, तर्फे वकीलसरफराझ मुश्ताफ मुजावर) } अर्जदार

**विरूध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. पिंपळगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. लासुर्णे ता. इंदापूर यांचा मौजे पिंपळगाव (पान) ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०२ मार्च १९७८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ मार्च १९७८ रोजी मौजे पिंपळगाव (पान) ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(शिक्का) तहसिलदार बार्शी

# दत्तात्रय सावंत यांचा वेतनासाठी पाठपुरावा; वेतन खात्यावर जमा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील माहे फेब्रुवारी पेड इन मार्च २०२६ चे वेतन काल शिक्षकांच्या खात्यावर जमा झाल्याची माहिती डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली. शासकिय कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १तारखेला खात्यावर जमा करण्याबाबतचा शासन निर्णय पारित करण्यात आला आहे.फेब्रुवारी महिन्याचे वेतन देयके फॉरवर्ड केल्यानंतर महिना अखेरला वाढीव घरभाड्याची थकित रक्कम अदा करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.त्यामुळे सर्व वेतन देयके रिजेक्ट करण्यात आले.नव्याने पुन्हा सर्व वेतन देयके फॉरवर्ड करण्यात आली.काही ठराविक शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनामुळे त्यात पुन्हा पेच निर्माण झाला.या सर्व प्रक्रीयेतुन मंगळवारी वेतन पथक कार्यालयामार्फत वेतन देयके ट्रेझरीला पाठविण्यात आली.गृहकर्ज,वैयक्तिक कर्ज,पतसंस्था,बँका व इतर हप्ते यामुळे शिक्षकांचे लक्ष वेतनाकडे होते.गुढीपाडवा व रमजान सणाच्या तोंडावर वेतनाचा प्रश्न उद्भवल्याने शिक्षक आर्थिक संकटात होते.वेतन देयके ट्रेझरीत पाठविल्यानंतर डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांनी माजी पुणे विभागीय शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर यांच्यायामार्फत वेतनासाठी वैभव राऊत यांच्याकडे पाठपुरावा केला. ट्रेझरी ऑफीसर वैभव राऊत यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन ई कुबेर प्रणालीद्वारे वेतन खात्यावर जमा केले. वेतन पथक अधिक्षक विठ्ठल ढेपे,वरिष्ठ लिपिक सोनल केत मॅडम यांचे सहकार्य लाभले.यासाठी आप्पाराव इटेकर,विनोद आगलावे,वल्लभ चौगुले व अ.गफुर अरब यांनी प्रयत्न केले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की,

मी श्रीमती सुवर्णमाला सुरेशसिंग चव्हाण असे जाहिर करते की माझे पती कै. सुरेशसिंग उंबरसिंग चव्हाण यांचे दि.१४/०३/२०१७ रोजी मयत झाले आहे. तसेच माझ्या पतीचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी वाहन परवाना दिलेला आहे. सदर परवाना क्रमांक MH13/509/SHR/96 असे असून सदरचा परवाना हा वाहन क्र. MH 13 G 7880 या वाहनावर असून सदरचा परवाना श्रीमती सुवर्णमाला सुरेशसिंग चव्हाण पत्नी या नात्याने माझ्या नावे करून घ्यावयाचा आहे.

तरी सदरचा परवाना माझे नावाने करण्यास कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी सात (०७) दिवसाच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे कागदोपत्रानिशी भेटावे

सही /-
श्रीमती सुवर्णमाला सुरेशसिंग चव्हाण

# दिनचर्या पाळणे अत्यंत गरजेचे - आ. रणजितसिंह मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) महाराष्ट्र राज्याची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अकलूज येथे उत्साहपूर्ण वातावरणात व मोठ्या दिमाखात पार पडली. या वेळी नियमित दिनचर्या पाळणे, आरोग्याची काळजी घेणे आणि समाजात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केले.



सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या 'उदय सभागृह', शंकरनगर (अकलूज) येथे आयोजित या सभेचे उद्घाटन आमदार मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, डॉ. राजू ताटेवार, डॉ. गजानन पडघम, डॉ. शैलेश निकम, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. सोपान खर्चे, डॉ. प्रताप सोमवंशी, डॉ. साधना कुलकर्णी, डॉ. अमिता कुकडे, डॉ. प्रज्ञा खोसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महत्त्वपूर्ण सभेचे यशस्वी यजमानपद निमा अकलूज शाखेने उत्कृष्ट नियोजनातून पार पाडले. राज्यभरातील डॉक्टर, पदाधिकारी आणि निमा परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी निमा अकलूज शाखेच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कार सोहळ' आयोजित करण्यात आला. तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास स. म. शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिला डॉक्टरांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

जीवनगौरव पुरस्कार डॉ. एम. पी. मोरे, डॉ. विठ्ठल महामुनी आणि डॉ. श्रीनिवास जामदार यांना प्रदान करण्यात आला.

तसेच निमा अकलूज शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप देवकाते, डॉ. आप्पासाहेब वाघमोडे, डॉ. रमेश बिडवे, डॉ. हरिश्चंद्र सावंत, डॉ. जयंत चव्हाण, डॉ. प्रविण पाटील, डॉ. शिरीष रणनवरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी 'निमारत्न' पुरस्काराने डॉ. शैलजा गुजर, डॉ. कांचन कुलकर्णी, डॉ. जयश्री माने, डॉ. निशात मुल्ला, डॉ. निलांबरी मगर, डॉ. माणिक मोटे, डॉ. विलास वाघ, डॉ. दिलीप वाघमोडे, डॉ. नानासाहेब तरंगे, डॉ. उदयसिंह माने-देशमुख, डॉ. उत्तम खरात, डॉ. बाळकृष्ण नष्टे, डॉ. सुधीर पोफळे, डॉ. अस्लम शेख, डॉ. दिलीप गुजर, डॉ. रोहित देशमुख यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निमा अकलूज शाखेचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले यामध्ये डॉ तानाजीराव कदम, डॉ. मिलिंद गुळभिले, डॉ अंजली कदम, डॉ.अमोल माने, डॉ. प्रशांत निंबाळकर, डॉ. हर्षवर्धन गायकवाड यांचा समावेश होता.

या भव्य कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, पदाधिकारी, निमा सदस्य आणि उपस्थितांचे आयोजकांच्या वतीने अकलूज निमा वुमन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ.विद्या एकतपुरे यांनी आभार मानले.

**जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निवीदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि.१८/१०/२०२३**

**परिशिष्ट-४**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक २, सोलापूर यांचे कार्यालय**

**मोहिते नगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर-४१३००३**

**दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७४०६६० ई-मेल पत्ता:- eebdd2solapur@gmail.com**

**ई-निविदा सूचना क्रमांक १८ सन २०२५-२६ (दुसरी वेळ)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामा करीता ई - निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) ब- निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://maharashtra.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. सविस्तर निविदा सुचना व ई - निविदाबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम स्तरावर राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कांही बदल होत असल्यास शासनाच्या https://maharashtra.gov.in संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत रु. | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | उजनी डावा कालवा वितरीका क्र.३९ वरील सा.क्र.३/६१० ते ३/९९० येथे व तसेच अस्तरीकरण करणे. | रु.३५,०९,२२९/- | सोलापूर |

१. ई - निविदा उपलब्ध कालावधी :- दि.१३.०३.२०२६ ते दि.२०.०३.२०२६

२. ई - निविदा उघडण्याचा दिनांक :- दि.२४.०३.२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. (तांत्रिक लिफाफा)

जा.क्र. भीविवि-२/लेशा-४/८२८/२०२६
भीमा विकास विभाग क्र. २,
सोलापुर दि. ०५/०३/२०२६
जिमाका/सो/जाहि/३७७/२०२५-२६

**सही/- (प्र.पां.कडुसकर)**
**कार्यकारी अभियंता**
**भीमा विकास विभाग क्र.२,सोलापूर**


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 194

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# शंकरनगर येथे जागतिक महिला दिन साजरा



**अकलुज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर बीट- १ येथे विविध ऊपक्रमांनी जागतिक महिला दिन मोठ्या ऊत्साहात साजरा करण्यात आला. सुमित्रानगर-शंकरनगर येथील फुलेवस्ती अंगणवाडी शाळेत साजरा कारण्यात आलेल्या या कार्यक्रमात परीसरातील आनेक महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी लिंबु- चमचा, संगित खुर्ची यासारखे कार्यक्रम घेवुन सहभागी महीलाना संसारोपयोगी याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अकलुज प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवार, सुपरवायझर आर. पी. चव्हाण यांचे मार्गदर्शन तर अंगणवाडी सेविका नंदा भोंग, आशा दिवटे, शिक्षिका कविता हिंगमिरे, स्नेहल ताटे, मदतनिस कोमल दिवटे, सुरेखा गोरे यांचे अनमोल सहकार्य लाभले.

# ‘मराठी शाळा वाचवा - शिक्षण वाचवा’ चा नारा देत आंदोलन



**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** राज्यातील मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे आणि रिक्त शिक्षक पदांची तात्काळ भरती करावी या मागण्यांसाठी ‘मराठी शाळा वाचवा - शिक्षण वाचवा’ या घोषणेसह सोमवारी (९ मार्च) पुण्यातील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर मोठे धरणे आंदोलन करण्यात आले. राज्यभरातील TAIT पात्र उमेदवार, डी.एड. व बी.एड. धारक युवक-युवती मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे शिक्षक भरतीसंदर्भात स्पष्ट रोडमॅप जाहीर करण्याची, राज्यातील रिक्त शिक्षक पदे तात्काळ भरण्याची तसेच मराठी माध्यमाच्या शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. वाढत्या रिक्त पदांमुळे शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता निर्माण होत असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनादरम्यान राज्याचे शिक्षण आयुक्त प्रताप सिंह तसेच शिक्षण उपसंचालक राजेश शिंदे यांच्याशी प्रतिनिधी मंडळाने चर्चा केली. या चर्चेसाठी कॉंग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांनी मध्यस्थी करत आंदोलनकर्त्यांचा मुद्दा प्रशासनापुढे मांडला.

आंदोलनकर्त्यांनी आपल्या प्रमुख मागण्यांचे लेखी निवेदन प्रशासनाला दिले. यानंतर पुढील स्तरावर सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन देण्यात आल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, ही केवळ रोजगारासाठीची लढाई नसून मराठी माध्यमाच्या शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी, विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीचा संघर्ष आहे. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या आंदोलनाला राज्यभरातील विद्यार्थी, युवक-युवती, महिला तसेच शिक्षक बांधवांनी पाठिंबा दर्शवला. आंदोलनानंतर आयोजकांनी सर्व सहभागींचे आभार मानले. आंदोलनानंतर शासन पुढे कोणती ठोस पावले उचलते, याकडे राज्यातील शिक्षक भरतीची वाट पाहणाऱ्या हजारो उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

# बेकायदेशीर तोडफोड करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा : सुरवसे-पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील कात्रज ते खंबाटकी घाट पायथा दरम्यान अनेक ठिकाणी महामार्गावरील दुभाजक बेकायदेशीररित्या तोडून अनधिकृत जोडरस्ते तयार करण्यात आल्याने अपघातांचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित दुभाजकांची तातडीने दुरुस्ती करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी केली आहे.

यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम तसेच पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कात्रज ते खंबाटकी घाट पायथा या दरम्यान काही हॉटेल तसेच व्यावसायिक आस्थापनांकडून



महामार्गाच्या दुभाजकांना तोडून थेट प्रवेशमार्ग तयार करण्यात आले आहेत.

त्यामुळे सेवा रस्त्यावरून येणारी वाहने अचानक महामार्गावर प्रवेश करत असून, महामार्गावरील वेगवान वाहतुकीमुळे अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

त्यामुळे या मार्गावरील ज्या ठिकाणी दुभाजक तोडण्यात आले आहेत,

त्या सर्व ठिकाणांची तातडीने पाहणी करून दुभाजकांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे करण्यात आली आहे.

तसेच महामार्गावरील दुभाजक बेकायदेशीररित्या तोडून अनधिकृत जोडरस्ते तयार करणाऱ्या संबंधित व्यक्ती, हॉटेल चालक किंवा आस्थापनांविरुद्ध चौकशी करून संबंधित कायद्यांनुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पोलिस प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

भविष्यात अशा प्रकारचे बेकायदेशीर प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठीही कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सुरवसे-पाटील यांनी निवेदनातून केली आहे.

दरम्यान, पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदिपसिह गिल्ल आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुणे विभागाचे कार्यकारी अभियंता अंकित यादव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# नातेपुते नगरपंचायतीकडून घरपट्टी व पाणीपट्टी वसूली जोमान

## २७ थकीत नळ कनेक्शन कट- मुख्याधिकारी शिंगाडे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते नगर पंचायतीच्या हद्दीतील मालमत्ता धारकांकडून आर्थिक वर्ष २०२५-२६ चा मालमत्ता कर, गाळे भाडे तसेच पाणीपट्टीच्या वसुलीची विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. या मोहीम मध्ये घरपट्टी व पाणीपट्टीची वसुली जोमाने होत असून सदर पाणीपट्टी थकीत असलेले २७ जणांचे नळ कनेक्शन कट करण्यात आले असल्याची माहिती नातेपुते नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी विकास शिंगाडे यांनी दिली. असून उर्वरित थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कट करणेत येणार असलेबाबत संबंधितांना नगरपंचायतीचे कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन सूचित करण्यात आले असल्याचेही शिंगाडे यांनी सांगितले.महाराष्ट्र नगरपरिषद,औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ नुसार मालमत्ता धारकांनी थकीत व चालू मालमत्ता कर, गाळे भाडे व पाणीपट्टी यांची संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक आहे. जे मालमत्ता धारक विहित मुदतीत थकबाकी भरणार नाहीत अशांच्या संकलित करावर दरमहा २% दंड स्वरूपात व्याजाची आकारणी नगरपंचायतीकडून करण्यात येत आहे.शासन नियमातील तरतुदीनुसार मालमत्ता



सील करणे, गाळा सील करून नगर पंचायतीच्या ताब्यात घेणे, पाणीपुरवठा नळ कनेक्शन बंद करणे, थकीत मालमत्ता व नळ कनेक्शन धारकांची नावे शहरातील प्रमुख चौकाचौकात प्रसिद्ध करणे यांसारखी कारवाई करण्याचे नियोजन नगरपंचायत वसुली विभाग यांनी केलेले आहे. त्यानुसार नगर पंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी वसूली मोहिमेत सहभागी झाले असून घरपट्टी व पाणीपट्टी भरणे बाबत घरोघरी जाऊन सूचना देत आहेत. तसेच घंटागाडी व रिक्षाद्वारे थकबाकी भरणे बाबत नागरिकांना जागृत करून आवाहन करण्यात आले आहे. घरपट्टी व पाणीपट्टी भरून घेण्यासाठी नगरपंचायत कार्यालय सुट्टीदिवशी देखील सुरू ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नातेपुते नगरपंचायत हद्द येथील नागरिकांनी व्याज आकारणी टाळण्यासाठी मालमत्ता धारकांनी आपल्याकडील थकीत मालमत्ता कर, गाळा भाडे पाणीपट्टी नगर पंचायतीच्या कार्यालयात येऊन तत्काळ भराव्यात अन्यथा थकबाकी दारांचे नळ कनेक्शन कट करण्याची कारवाई पाणीपट्टी विभागामार्फत सुरू केली असल्याचेही मुख्याधिकारी विकास शिंगाडे यांनी सांगितले. नातेपुते नगर पंचायतीच्या हद्दीतील मालमत्ता व नळ कनेक्शन धारक यांनी थकीत व चालू घरपट्टी व पाणीपट्टी कराचा भरणा नगर पंचायत कार्यालयात लवकरात लवकर येऊन भरावे असे आवाहनही नातेपुते नगरपंचायतीच्या वतीने थकीतदारांना केले आहे.

# गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी सर्व स्तरावर जनजागृती करावी -प्र. जिल्हाधिकारी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महिलांमध्ये वाढता गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासन 'एचपीव्ही' मोहिम राबवत आहे. या मोहिमेसाठी सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे आणि शिक्षण विभागाच्या समन्वयाने प्रत्येक पात्र मुलीपर्यंत पोहोचण्याचे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिले. एचपीव्ही लसीकरणाच्या अनुषंगाने जंगम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात विशेष बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, आरोग्य अधिकारी मनपा डॉ राखी माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ श्रीकांत कुलकर्णी, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, जिल्हा क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ विनोद अभिवत, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (जिल्हा रुग्णालय) डॉ संतोष जोगदंड, कार्यकारी अभियंता महावितरण (शहर) हे उपस्थित होते.

बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी 'एचपीव्ही' लसीकरणाच्या तांत्रिक बाजूवर सखोल चर्चा केली. १४ ते १५ वयोगटातील (१४ वर्षे पूर्ण) मुलींना या जीवघेण्या आजारापासून वाचवण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी आहे. या मोहिमेअंतर्गत पात्र मुलींना लसीचा एकच डोस दिला जाणार आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तालुकास्तरीय बैठका आणि पालकांचे समुपदेशन तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिल्या.

एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित आहे. समाजातील कोणत्याही अंधश्रद्धा किंवा अफवांना पालकानी बळी पडू नये. आपल्या मुलीचे आरोग्य सुरक्षित करण्यासाठी पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करून लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले यांनी यावेळी केले. शिक्षण विभागाने शाळांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये याविषयी जनजागृती करावी, असेही त्यांनी नमूद केले.

# ‘इन्स्पायर २०२६’ या आंतरराष्ट्रीय परिषदेचे एसबीपीआयएम मध्ये आयोजन


**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) यांच्या वतीने ‘इन्स्पायर २०२६’ या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ आणि १४ मार्च २०२६ रोजी करण्यात आले असल्याची माहिती एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे. परिषदेत "शाश्वत जागतिक भविष्यासाठी व्यवसायिक नव संकल्पनांचा मार्ग" (“Responsible Business Innovation: Driving Change for Sustainable Global Future”)या महत्त्वपूर्ण विषयावर देश विदेशातील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ व विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे.

परिषदेचे उद्घाटन उद्योजक डॉ. प्रशांत पानसरे यांच्या हस्ते होणार आहे. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई आदी देशांतील संशोधकांनी यासाठी नोंदणी केली आहे. यामध्ये ५३८ लेखक सहभागी होणार आहे. तसेच २४० संशोधन लेख सादर करण्यात येणार आहेत.

परिषदेसाठी संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुदरे, डॉ. दिलीप पवार, डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. काजल माहेश्वरी आणि डॉ. संतोष शिंदे समन्वयक म्हणून काम करत आहेत. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

# दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**भिगवण (कटूसत्य वृत्त):-** दत्तकला शिक्षण संस्था संचलित दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, स्वामी-चिंचोली येथे “Trends in Management and Engineering Streams (TIMES 2K26)” या विषयावर पहिली आंतरराष्ट्रीय परिषद दिनांक १३ व १४ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , पुणे तसेच University of Science and Technology of Southern Philippines यांच्या सहकायार्ने व संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. रामदास झोळ आणि संस्थेच्या सचिवा मा. सौ. माया झोळ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित



करण्यात आली आहे. व्यवस्थापन व अभियांत्रिकी क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा घडवून आणणे, संशोधकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच विद्यार्थी व शिक्षकांमध्ये संशोधन संस्कृती विकसित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

या परिषदेसाठी देश-विदेशातील मान्यवर तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. प्रा. डी. एस. चौहान (प्रो चान्सलर LA युनिव्हर्सिटी मथुरा उ. प्रदेश) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून डॉ. कॅथलीन एबोरा पॅड्रिगालन व डॉ. मायसेल ए. कॅपिलायन (फिलिपाईन्स), डॉ. द्वी सुदार्नो पुत्रा (इंडोनेशिया) तसेच डॉ. फिरोज इस्माईल मुलाणी (तैवान) हे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

परिषदेत संशोधन निबंध सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन तसेच विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले असून देश-विदेशातील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या परिषदेत सर्व विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेच्या सचिव मा. सौ. माया झोळ व संस्थापक-अध्यक्ष मा. प्रा. रामदास झोळ यांनी केले आहे.

# अनगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** शासनाच्या विविध योजना व त्याचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी कागदपत्रे व दाखले हे गावातच उपलब्ध व्हावेत यासाठी महसूल विभागाच्या वतीने अनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्याचे उद्घाटन मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते साखर कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील उपस्थित होते.

यावेळी पंचायत समिती सदस्य संजीव दादा खिलारे,उपनगराध्यक्ष श्रीकांत घाटोळे, नगरसेवक नारायण गुंड, श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, उपप्राचार्य माधव खरात अनगरचे मंडल अधिकारी बालाजी नागटिळक आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार सचिन मुळीक यांनी या शिबिराचा हेतू स्पष्ट करून यात कोणकोणते दाखले व कागदपत्रे मिळतील याची माहिती दिली.

लोकनेतेचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी महसूल विभागाच्या वतीने गावातच दाखले उपलब्ध करून दिल्याबद्दल तहसीलदार सचिन मुळीक यांचे आभार मानले. या शिबिरात अन्नसुरक्षा लाभार्थी रेशन कार्डचे वाटप, संजय



गांधी निराधार योजना लाभार्थींना मंजुरी पत्रे वाटप व श्रावण बाळ निराधार योजना लाभार्थी यांना शिबिरात पत्राचे प्रातिनिधिक स्वरुपात वाटप करण्यात आले.

या शिबिरात महसूल विभाग, आरोग्य विभाग, बचत गट, अंगणवाडी सेविका, कृषी विभाग,पुरवठा विभाग, नगरपंचायत विभाग, शिक्षणविभागआदी विभागाने सक्रिय सहभाग घेतला.

या शिबिरात खालील दाखले व कागदपत्रे काढण्यासाठीचे शिबिर घेण्यात आले

प्रलंबित फेरफार, सातबारा मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीने सातबारा आणि आठ अ उताराचे वाटप, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक परवानगी, अकृषिक तरतुदी बाबत मार्गदर्शन व सुधारणा, नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसा’ योजनांचे लाभ मंजूर, विद्यार्थ्यासाठी दाखले वाटप, तुकडेबंदी लाभाच्या उल्लंगणाबाबतच्या प्रकरणांचा निपटारा, घरासाठी पट्टेवाटप, ई मोजणी अर्ज व पी एम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करणे व गाव दप्तर अद्यावत बाबत, दिव्यांग प्रमाणपत्र व आधार कार्ड संलग्न करणे, आरोग्य विभागाच्या वतीने नेत्र तपासणी, आयुष्यमान भारत आधी दाखले व कागदपत्रे ची पूर्वतयारी करण्यात आली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महसूल विभागाचे मंडल अधिकारी बालाजी नागटिळक, ग्राम महसूल अधिकारी महसूल अधिकारी सुदर्शन जाधव, नंदकिशोर दांडगे, हरिदास ताले' नुतन गोडसे, सुभाष घाडगे, बापु उघडे, बाळू मोरे आदि आधिकारी व कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# कुर्डूवाडी राज्य उत्पादन शुल्क विभागाचा ‘मंथली’ कारभार चव्हाट्यावर

## एएसआय आनंद जोशी यांची लाचेची मागणी करीत असलेली कथित कॉल रेकार्डीगची क्लिप व्हायरल

**माढा (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कुडूर्वाडी कार्यालयातील कथित भ्रष्टाचाराचा एक धक्कादायक प्रकार समोर आला असून सहाय्यक फौजदार (ASI) आनंद जोशी यांची लाचेबाबतची कॉल रेकार्डीग ची क्लिप सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या क्लिपची दिव्य मराठी पुष्टी करीत नाही.

दरमहा ‘मंथली’ स्वरूपात १५०० रुपये देण्याबाबत उघडपणे चर्चा होत असल्याचे संवादातून समोर आले आहे.

व्हायरल झालेल्या क्लिपमध्ये कुडूर्वाडी येथील उत्पादन शुल्क विभागात कार्यरत असलेले

> बघु काय होतंय ..माझी चौकशी चालु आहे..माझी कार्यालयीन चौकशी सुरु आहे.मुद्दाम त्रास देण्याच्या उदेदशाने क्लिप व्हायरल करण्यात आली असून मला बाईट-प्रतिक्रिया वगैर काय देता येणार नाही.या प्रकरणाची माझी वरिष्ठ पातळीवर चौकशी सुरु आहे.
>
> – asi आनंद जोशी

ए.ए.स.आय आनंद जोशी एका ढाबा -हॉटेल चालक व्यक्तीला फोन करून ओळख पटवतात आणि त्यानंतर नियमित ‘हप्ता’ देण्याबाबत बोलताना ऐकू येतात.

दरमहा २००० रुपये देण्याबाबत चर्चा होत असताना समोरील व्यक्तीने ती रक्कम जास्त असल्याचे सांगून कमी करण्याची विनंती केली आहे.

यानंतर दोघांमधील चर्चेनंतर अखेर दरमहा १५०० रुपयांवर विषय ठरत असल्याचे या ऑडिओ क्लिपमध्ये ऐकू येते. तसेच ‘मी आहे तोपर्यंत परमिट रूमचे काम करून देतो, फक्त रेगुलर हप्ता द्या,’ असेही जोशी बोलत आहेत.

त्यावर समोरील व्यक्ती देखील हप्ता देण्यास तयार असल्याचे सांगत ‘फक्त ओळख ठेवा,’ अचानक येऊ नका. अशी विनंती करत असल्याचे क्लिपमध्ये ऐकू येते. दरम्यान, ही क्लिप सोशल मीडियावर

**व्हायरल ऑडिओ क्लिपमधील कथित संभाषण:**

**एएसआय आनंद जोशी:** हॅलो-ओळखलं का मला?
**समोरील व्यक्ती:** हो सर, ओळखलं- बोला.
**एएसआय आनंद जोशी:** तुमचं परमिट रूमचं काम आहे ना-ते करून देतो. पण रेगुलर मंथली ठेवावी लागेल.
**समोरील व्यक्ती:** किती सर?
**एएसआय आनंद जोशी:** दरमहा दोन हजार रुपये द्यावे लागतील.
**समोरील व्यक्ती:** सर, दोन हजार जास्त होतायत- थोडं कमी करा.
**एएसआय आनंद जोशी:** ठीक आहे- मग दीड हजार करा. पण रेगुलर पाहिजे.
**समोरील व्यक्ती:** ठीक आहे सर- देतो. फक्त ओळख ठेवा.
**एएसआय आनंद जोशी:** हो- मी आहे तोपर्यंत परमिट रूमचं काही प्रॉब्लेम होऊ देणार नाही. फक्त मंथली रेगुलर द्या.

मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने उत्पादन शुल्क विभागात किती भ्रष्टाचार चालतो.यावरुन प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर ठोस कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची नूतन कार्यकारणी जाहीर

## विकास कस्तुरे अध्यक्ष तर सचिन जाधव कार्याध्यक्ष पदी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याच्या सोलापूर शहर नूतन पदाधिकाऱ्यांची निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी जाहीर केली असून अध्यक्षपदी विकास कस्तुरे , कार्याध्यक्षपदी सचिन जाधव, उपाध्यक्षपदी विक्रम इंगळे, तर सचिव पदी शिवाजी सावंत यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. विशेष म्हणजे या बैठकीत डिजिटल मीडिया संपादक पत्रकार



संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी प्रशांत कटारे यांची तर पश्चिम महाराष्ट्र संघटक पदी परशुराम कोकणे यांची निवड करण्यात आली आहे.

शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीत डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने सर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. त्यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांना राजा माने सर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

राजा माने सर यांनी आपल्या मनोगतात डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची संपूर्ण देशभरात वाटचाल सुरू असल्याचे सांगितले. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या उन्नतीसाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

**निवडण्यात आलेले नूतन पदाधिकारी पुढील प्रमाणे:**

पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष: प्रशांत कटारे
पश्चिम महाराष्ट्र संघटक : परशुराम कोकणे

**सोलापूर शहराची नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे :**

विकास कस्तुरे : अध्यक्ष
सचिन जाधव : कार्याध्यक्ष
रवींद्र जोगीपेठकर : सरचिटणीस
विक्रम इंगळे : उपाध्यक्ष
इमरान सगरी : उपाध्यक्ष
चंदन बोल्लू : खजिनदार
शिवाजी सावंत : सचिव
शहानवाज शेख : संघटक
अकबर बागवान : प्रसिद्धीप्रमुख

**कार्यकारणी सदस्य पुढील प्रमाणे:**

आप्पा बनसोडे, जहूर सय्यद, अनिल कांबळे, अर्जुन चव्हाण, साकिब शेख, प्रसाद ठक्का, योगेश कल्याणकर, बालाजी चिटमिल, दयानंद मामड्याल, इकबाल शेख, आबादी राजे